# नागपूर महानगरपालिका,नागपूर

**(नागपूर अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग)**

माहितीचा अधिकार अधिनियम- 2005 अंतर्गत स्वयंप्रेरणेने

प्रकाशित/प्रसिद्ध करावयाची माहिती

| | |
|---|---|
| 4 (1) पंधरा | **माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, कामकाजाच्या वेळांचा तपशील.**<br>नागपूर अग्निश्मन व आपत्कालीन सेवा, महानगरपालिका, नागपूर या कार्यालयाची कार्यालयीन वेळ सकाळी 9.45 ते संध्याकाळी ६:15 असून टपाल स्विकारण्याची वेळ सकाळी 10 ते संध्याकाळी ४:३० पर्यंत आहे. तसेच अग्निशमन विभागाची सेवा 24 तास सुरु असून, मुख्य अग्निशमन आणि अधिकारी व अग्निशमन केंद्र अधिकारी यांच्या अग्निशमन सेवा २४ तास कार्यरत आहेत. स्थानाधिकारी व इतर कर्मचा-याच्या सेवा ८-८ तासाचे पाळीत (सकाळी ८ ते १६, दुपारी १६ ते २४, व रात्री २४ ते सकाळी ८ वाजे पर्यंत) कार्यरत आहेत. तसेच डिझास्टर सेल विभागातर्फे नागरीकांना अग्निसुरक्षा विषयक धडे देण्याचे कार्य करण्यात येते. तसेच सिव्हील अग्निशामक स्थानक व लकडगंज अग्निशामक केंद्रातर्फे आपत्कालीन परिस्थितीत शुल्क स्विकारुन विहीरीतील पाण्याचा उपसा केला जातो. तसेच अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे निर्माण होणारा वार्षिक अहवाल मा. आयुक्त्, मनपा, नागपूर यांचे समोर दरवर्षी सादर करण्यात येतो. तसेच माहिती अधिकार-२००५ अंतर्गत कलम २५ अंतर्गत गोषवारा हा सामान्य प्रशासन विभाग, म.न.पा. नागपूर यांना पाठविण्यात येतो.<br>महानगरपालिकेतर्फे जन सामान्यासाठी व कर्मचा-यांसाठी ग्रंथालयाची निर्मिती करण्यात आली असून, त्याचा स्वतंत्र विभाग म.न.पा. नागपूर द्वारा निर्मित करण्यात आला आहे.<br>अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागातर्फे कोणतेही ग्रंथालय उपलब्ध नाही. |